# नाशिक

नाशिक

उद्योग विकासासाठी प्रयत्न करणार पालकमंत्री छगन भुजबळ यांचे प्रतिपादन




पाथर्डी फाटा | दि. २१ वार्ताहर उद्योजकांच्या अडीअडचणी सोडविण्याबरोबरच ज्या विभागातील उद्योग नव्याने आपल्याकडे येण्यास इच्छुक असतील त्यांना शासनाकडून चांगले सहकार्य केले जाईल. उद्योजकांच्या अडीअडचणी सोडविण्याचा प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री छगन भुजबळ यांनी केले. महाराष्ट्र औद्योगिक, आर्थिक विकास असोसिएशन व लघु, मध्यम उद्योग विकास चेंबर ऑफ इंडिया यांच्यातर्फे आयोजित केलेल्या लघु व मध्यम उद्योजकांच्या परिषदेप्रसंगी ते बोलत होते. यावेळी अध्यक्ष चंद्रकांत साळुंके उपस्थित होते. यावेळी बोलताना भुजबळ म्हणाले की, लघु व मध्यम उद्योगांना चालना देण्याचा शासनाचा निर्णय असून यासाठी आपण स्वतःही प्रयत्न करणार आहे. यावेळी साळुंके यांनी सांगितले की, नाशिक विभागातील उद्योगांची संख्या वाढली पाहिजे. उद्योजकांना उद्योग उभारणीपासून अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी शासनाने ठोस नियोजन केले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी कॅप्रिहन्स इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक रॉबिन बॅनर्जी, चीनमधील युफा कॉन्सुलट जनरल लि. युफा , कोटक कंपनीचे अध्यक्ष व इंटरनॅशनल चेंबर ऑफ कॉमर्सचे माजी अध्यक्ष सुरेश कोटक, महाराष्ट्र औद्योगिक आणि आर्थिक विकास असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत साळुंखे आदी मान्यवर उपस्थित होते. दिवसभरात झालेल्या दोन सत्रांमध्ये उद्योजकांना विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

Print